(wc-109)

OK

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 225
दिनांक 27/10/2023
मुख्य लेखापाल

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : ०२२ ६९४०३३३३ ई.मेल :collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in

**पाणथळ तक्रार क्र.१०९** क्र.:सी/कार्या-२ आय/टे-८/पाणथळ/तक्रार क्र.१०९/२०२३
दिनांक : १८/१०/२०२३ 23089

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा
उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३रा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंटजवळ,
बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

**विषय** : Request for restoration of Culvem Lake Gorai and also action against destroyers of wetlands... **(तक्रारदार- श्री.स्टॅलीन डी.)**

**संदर्भ** : १. श्री. स्टॅलीन डी. यांचा ई-मेल अर्ज दि.१५/०४/२०२३.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र दि.०३/०५/२०२३.
३. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचा अहवाल पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५कांदळवन/कावि-४२७/२०२३, दि.२६/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी सादर करण्यात येते की, संदर्भ क्र. १ व ३ अन्वये श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे गोराई ता. बोरीवली येथील (Culvem Lake) केल्वेम तलावमध्ये उत्खनन करुन तसेच सदर तलावाच्या बाजूस भरणी करुन सदर तलावाचा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. तसेच सदर तलावाचा / पाणथळ क्षेत्राचा ऱ्हास केल्या प्रकरणी संबधितांवर कारवाई करणेकामी विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार, उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र.३ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता पुढीलप्रमाणे माहिती सादर करणेत येत आहे.

प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी मौजे मनोरी, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १८५ या शासकीय मिळकतीवर दि. ३०/०५/२०२३ रोजी वनरक्षक मालवणी व वनरक्षक मनोरी

यांच्या समवेत संयुक्त स्थळपहाणी केली असता, तक्रारीत नमूद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच कांदळवनापासून सदरचे क्षेत्र ५० मी. च्या बाहेर येत आहे. तसेच MRSAC नकाशानुसार सन २००५ साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यास्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही.

तसेच सदर तक्रारीचे अनुषंगाने विषयांकीत मिळकतीची दि. ११/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता १)सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, २) तहसीलदार बोरीवली, ३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई, ४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती. सदर स्थळपाहणीचे दिवशी मा.अवर सचिव, पर्यावरण विभाग, वनपरिमंडळ अधिकारी, गोराई, परिरक्षण भूमापक क्र. ३, मंडळ अधिकारी, कुरार, तलाठी साझा गोराई व तक्रारदार, श्री. स्टॅलिन डी चे प्रतिनिधी, श्री. नंदकुमार पवार यांचे समवेत दि.११/०९/२०२३ रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आलेली आहे.

प्रकरणी मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ येथील तलावाची पाहणी करण्यात आली. त्यावेळेस सदर तलाव हा पूर्णत: पावसाच्या पाण्याने भरलेला दिसून आला. तसेच तलावाच्या उत्तर व पूर्व दिशेस सिमेंट क्रॉंक्रीटचा रस्ता असून, तलावाच्या बाजूने सिमेंटचा पक्का कट्टा असल्याचे दिसून आले. व तलवामध्येच उत्तरेकडील बाजूस जुने पक्के बांधकाम केल्याची विहीर आहे. तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस गोराई व मनोरी गावाला जोडणारा पक्का रस्ता आहे व तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस एक अतिक्रमण व दुसरी विहीर आहे. त्यावर मोट बांधलेली आहे. तसेच तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस मोठा मातीचा ढीग लागलेला दिसून आला. तलावाच्या पूर्वेकडील नविन खोदकाम करून अंदाजे २५ x २० मीटर असा खड्डा केलेला दिसून आला. त्यामध्ये पाणी साचल्याचेही दिसून आले. व त्याची खोली अंदाजे ५ मीटर इतकी आहे. तलावाचा वापर गावकरी कपडे धुण्याकरीता, जनावरांना पाणी पिणेकरीता तसेच आंघोळीकरीता वापर करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले. तलावाची **चर्तु:सिमा** पुढीलप्रमाणे आहे.

पूर्वेस मोकळी जागा व आदिवासी घरे, पश्चिमेस डांबरी पक्का रस्ता, उत्तरेस खाजगी मिळकत, दक्षिणेस खाजगी मिळकत आहे. मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ हा सरकारी असून जागेवर नैसर्गिक तलाव आहे. गोराई तसेच मनोरी या गांवामध्ये पाणथळ जमिनी नाहीत. सदरचा तलाव सुशोभीकरणाकरीता मा. आमदार श्री. सुनिल राणे, बोरीवली विधानसभा यांचे स्थानिक विकास निधीमधून खर्च करणेस यांना मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-७क/कावि-४१/२०२३ दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आलेली आहे.

उपरोक्त नमूद तलावाचे सुशोभीकरण करतांना माती काढण्यात आली असून सदरची माती तलावाच्या क्षेत्रामध्येच ठेवण्यात आलेली आहे.

**" महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे मुख्य नियमांचे नियम ४६ मध्ये सुधारणा करून दि. ११/५/२०१५ रोजीच्या सुधारीत अधिसुचनेनुसार उपरोक्त गौणखनिज उत्खनन नियमात बदल करून ज्यावेळी एखादया जमिनीचा, एखादया भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामीत्वधन आकारले जाणार नाही"** अशी तरतूद आहे.

तसेच मौजे- मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या सरकारी तलावाची मोजणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून सदरच्या तलावाची मोजणी केल्यानंतर आजुबाजूच्या स्थानिक लोकांची अतिक्रमणे सरकारी तलावामध्ये येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सर्व अतिक्रमणधारकांना उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० अंतर्गत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रकरणी पुढील कार्यवाही उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे. तरी मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या जागेमध्ये तलाव असून, सदर जागा पाणथळ मधून अधिसुचित नाही, असे नमूद केले आहे.

उपरोक्तप्रमाणे आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सदरचा अहवाल सविनय सादर करणेत येत आहे.

(सतिश बागल)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.**

प्रत- उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे माहितीसाठी रवाना.

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६ ईमेल- sdomsdest@gmail.com

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५-कांदळवन/कावि- ४२७/२०२३
दिनांक : २०/०९/२०२३

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

**विषय** : Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of Wetland...

**संदर्भ** : १. आपलेकडील पत्र क्र. सी/कार्या-२आय /कांदळवन/कावि- २५८/२०२३, दि. ०४/०५/२०२३
२. वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र.अ. पश्चिम मुंबई /स्टॅलीन डी. /४६५/२०२३-२४, दि. ०४/०७/२०२३.
३. तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र. तह/बोरी/टे-२/कांदळवन / कावि-११३३/२०२३, दि. २८/०८/२०२२३
४. या कार्यालयाचे पत्र क्र. कार्या-५/कावि-४२७/२०२३, .०५/०९/२०२३
५. तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र. तह/बोरी/टे-२ / कांदळवन / कावि-११३३/२०२३, दि. १३/०९/२०२३

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपलेकडील संदर्भी पत्र क्र. १ अन्वये प्राप्त झालेल्या तक्रारदार श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे गोराई, ता. बोरीवली येथील (Culvem Lake) केल्वेम तलावमध्ये उत्खन्न करून तसेच सदर तलावाच्या बाजूस भरणी करून सदर तलावाचा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार केलेली आहे. तसेच सदर तलावाचा / पाणथळ क्षेत्राचा ऱ्हास केल्या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करणेकामी विनंती केलेली आहे. सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई व तहसीलदार बोरीवली यांचेकडे पाठविले असता त्यांनी अनुक्रमे संदर्भीय पत्र क्र. २ व ३अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी मौजे मनोरी, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १८५ या शासकीय मिळकतीवर दि. ३०/०५/२०२३ रोजी वनरक्षक मालवणी व वनरक्षक मनोरी यांच्या समवेत संयुक्त स्थळपहाणी करून अहवाल सादर केला आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचे अहवाला मध्ये तक्रारीत नमूद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच कांदळवनापासून सदरचे क्षेत्र ५० मी. च्या बाहेर येत



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

आहे. तसेच MRSAC नकाशानुसार सन २००५ साली सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यास्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही. असे नमूद केले आहे.

तसेच प्रकरणी या कार्यालयाचे संदर्भिय क्र. ४ च्या पत्रान्वये कोकण पाथळण तक्रार निवारण समितीकडील तक्रारीचे अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. १०/०८/२०२३ व दि. ०१/०९/२०२३ रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये विषयांकीत तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने संदर्भीय पत्र क्र. ४ चे पत्रान्वये विषयांकीत मिळकतीची दि. ११/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता १) सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, २) तहसीलदार बोरीवली, ३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई, ४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती.

सदर स्थळपाहणीचे दिवशी मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, वनपरिमंडळ अधिकारी, गोराई, परिरक्षण भूमापक क्र. ३, मंडळ अधिकारी, कुरार, तलाठी साझा गोराई व तक्रारदार, श्री. स्टॅलिन डी चे प्रतिनिधी, श्री. नंदकुमार पवार यांचे समवेत दि. ११/०९/२०२३ रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आलेली आहे.

मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ येथील तलावाची पाहणी करण्यात आली. त्यावेळेस सदर तलाव हा पूर्णतः पावसाच्या पाण्याने भरलेला दिसून आला. तसेच तलावाच्या उत्तर व पूर्व दिशेस सिमेंट क्राँक्रीटचा रस्ता असून, तलावाच्या बाजूने सिमेंटचा पक्का कट्टा असल्याचे दिसून आले. व तलवामध्येच उत्तरेकडील बाजूस जुने पक्के बांधकाम केल्याची विहीर आहे. तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस गोराई व मनोरी गावाला जोडणारा पक्का रस्ता आहे. व तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस एक अतिक्रमण व दुसरी विहीर आहे. त्यावर मोट बांधलेली आहे. तसेच तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस मोठा मातीचा ढीग लागलेला दिसून आला. व तलावाच्या पूर्वेकडील नविन खोदकाम करून अंदाजे २५ x २० मीटर असा खड्डा केलेला दिसून आला. त्यामध्ये पाणी साचल्याचेही दिसून आले. व त्याची खोली अंदाजे ५ मीटर इतकी आहे.

तलावाचा वापर गावकरी कपडे धुण्याकरीता, जनावरांना पाणी पिणेकरीता तसेच आंघोळीकरीता वापर करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले. तलावाची चर्तु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.

पूर्वेस मोकळी जागा व आदिवासी घरे, पश्चिमेस डांबरी पक्का रस्ता, उत्तरेस खाजगी मिळकत, दक्षिणेस खाजगी मिळकत आहे. (सोबत मूळ पंचनामा जोडला आहे.)

मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ हा सरकारी असून जागेवर नैसर्गिक तलाव आहे. गोराई तसेच मनोरी या गांवामध्ये पाणथळ जमिनी नाहीत. सदरचा तलाव सुशोभीकरणाकरीता मा. आमदार श्री. सुनिल राणे, बोरीवली विधानसभा यांचे स्थानिक विकास निधीमधून खर्च करणेस यांना मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-७क/कावि-४१/२०२३ दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आलेली आहे.



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-I

उपरोक्त नमूद तलावाचे सुशोभीकरण करतांना माती काढण्यात आली असून सदरची माती तलावाच्या क्षेत्रामध्येच ठेवण्यात आलेली आहे.

**" महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे मुख्य नियमांचे नियम ४६ मध्ये सुधारणा करून दि. ११/५/२०१५ रोजीच्या सुधारीत अधिसुचनेनुसार उपरोक्त गौणखनिज उत्खनन नियमात बदल करून ज्यावेळी एखादया जमिनीचा, एखादया भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामीत्वधन आकारले जाणार नाही.** " अशी तरतूद आहे.

मौजे- मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या सरकारी तलावाची मोजणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून सदरच्या तलावाची मोजणी केल्यानंतर आजुबाजूच्या स्थानिक लोकांची अतिक्रमणे सरकारी तलावामध्ये येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सर्व अतिक्रमणधारकांना उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० अंतर्गत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रकरणी पुढील कार्यवाही उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे.

तरी मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या जागेमध्ये तलाव असून, सदर जागा पाणथळ मधून अधिसुचित नाही. तरी अहवाल आदेशार्थ सादर.

(डॉ. भागवत गावंडे)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दूरध्वनी क्र. २८०७५०३४ ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन क्रमांक :-तह/बोरी/टे-२/कांदळवन/कावि-११३३/२०२३
दिनांक :-१३/०९/२०२३

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

विषय:-**Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of wetland**
श्री. स्टॅलीन डी.

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५-कांदळवन/कावि-४२७/२०२३ दि. २२/०५/२०२३
२) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/स्थळपाहणी/३५९/२०२३-२४ दि. ३०/०५/२०२३.
३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/स्टॅलीन डी./४६५/२०२३-२४ दि. ०४/०७/२०२३.
४) या कार्यालयाचा अहवाल पत्र क्र. तह/बोरी/टे-२/कांदळवन/कावि-११३३/२०२३ दि. २८/०८/२०२३
५) आपलेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४२७/२०२३ दि. ०५/०९/२०२३.
६) मंडळ अधिकारी, कुरार यांचा अहवाल दि. १२/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपलेकडील संदर्भिय क्र. १ चे अनुषंगाने सादर करणेत येते की, प्रकरणी तक्रारदार, श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे-गोराई, ता. बोरीवली न.भू.क्र. १८५ येथील (Culvem Lake) कुल्वेम तलावामध्ये उत्खनन करून तसेच संदर तलावाच्या बाजूस भरणी करून संदर तलावाचा -हास होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली होती.

त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी वनरक्षक मालवणी व वनरक्षक मनोरी यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी करून संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये या कार्यालयात सादर केलेल्या अहवालानुसार या कार्यालयाने संदर्भिय क्र. ४ चे पत्रान्वये आपले कार्यालयास अहवाल सादर करणेत आलेला आहे. (सोबत प्रत)

तसेच प्रकरणी आपलेकडील संदर्भिय क्र. ५ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रात कोकण पाथळण तक्रारीचे अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. १०/०८/२०२३ व दि. ०१/०९/२०२३ रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये विषयांकीत तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने आपलेकडील संदर्भिय क्र. ५ चे पत्रान्वये विषयांकीत जमीनीची दि. ११/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता १) सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, २) तहसीलदार बोरीवली, ३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई, ४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती.

सदर स्थळपाहणीचे दिवशी मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, २) मा. उपविभागीय अधिकारी, मुं.प.उ., ३) वनपरिमंडळ अधिकारी, गोराई, ४) परिरक्षण भूमापक क्र. ३, ५) मंडळ अधिकारी, कुरार, ६) तलाठी साझा गोराई व तक्रारदार, श्री. स्टॅलिन डी चे प्रतिनिधी, श्री. नंदकुमार पवार यांचे समवेत दि. ११/०९/२०२३ रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मंडळ अधिकारी, कुरार यांनी सादर केलेल्या संदर्भिय क्र. ५ अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

सदर स्थळपाहणी दरम्यान मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ येथील तलावाची पाहणी करण्यात आली. त्यावेळेस सदर तलाव हा पूर्णतः पावसाच्या पाण्याने भरलेला दिसून आला. तसेच तलावाच्या उत्तर व पूर्व दिशेस सिमेंट क्रॉंक्रीटचा रस्ता असून, तलावाच्या बाजूने सिमेंटचा पक्का कट्टा असल्याचे दिसून आले. व तलवामध्येच उत्तरेकडील बाजूस जुने पक्के बांधकाम केल्याची विहीर आहे. तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस गोराई व मनोरी गावाला जोडणारा पक्का रस्ता आहे. व तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस एक अतिक्रमण व दुसरी विहीर आहे. त्यावर मोट बांधलेली आहे. तसेच तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस मोठा मातीचा ढीग लागलेला दिसून आला. व तलावाच्या पूर्वेकडील नविन खोदकाम करून अंदाजे २५ x २० मीटर असा खड्डा केलेला दिसून आला. त्यामध्ये पाणी साचल्याचेही दिसून आले. व त्याची खोली, अंदाजे ५ मीटर इतकी आहे.

स्थळपाहणीचे वेळी तलावाचा वापर गावकरी कपडे धुण्याकरीता, जनावरांना पाणी पिणेकरीता तसेच आंघोळीकरीता वापर करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले. तलावाची चर्तु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.

पूर्वेस मोकळी जागा व आदिवासी घरे, पश्चिमेस डांबरी पक्का रस्ता, उत्तरेस खाजगी मिळकत, दक्षिणेस खाजगी मिळकत आहे. (सोबत मूळ पंचनामा जोडला आहे.)

मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ हा सरकारी असून जागेवर नैसर्गिक तलाव आहे. गोराई तसेच मनोरी या गांवामध्ये पाणथळ जमिनी नाहीत. सदरचा तलाव सुशोभीकरणाकरीता


Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE, COLMSD-REV-ASST (SMB) ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

मा. आमदार श्री. सुनिल राणे, बोरीवली विधानसभा यांना मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-७क/कावि-४१/२०२३ दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. (सोबत प्रत)

उपरोक्त नमूद तलावाचे सुशोभीकरण करतांना माती काढण्यात आली असून सदरची माती तलावाच्या क्षेत्रामध्येच ठेवण्यात आलेली आहे. " महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे मुख्य नियमांचे नियम ४६ मध्ये सुधारणा करून दि. ११/५/२०१५ रोजीच्या सुधारीत अधिसुचनेनुसार उपरोक्त गौणखनिज उत्खनन नियमात बदल करून इमारतीच्या गौणखनिज उत्खननाबाबत ज्यावेळी एखादया जमिनीचा, एखादया भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामीत्वधन आकारले जाणार नाही. " असे नमूद आहे.

मौजे- मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या सरकारी तलावाची मोजणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून सदरच्या तलावाची मोजणी केल्यानंतर आजुबाजूच्या स्थानिक लोकांची अतिक्रमणे सरकारी तलावामध्ये येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सर्व अतिक्रमणधारकांना मा. उप जिल्हाधिकारी (अति./निष्का), मालाड यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० अंतर्गत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रकरणी पुढील कार्यवाही मा. उप जिल्हाधिकारी (अति./निष्का) मालाड यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे.

तरी मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या जागेमध्ये तलाव असून, सदर जागा पाणथळ क्षेत्रामध्ये मोडत नाही. पुढील उचित कार्यवाहीस्तव व माहितीस्तव सविनय सादर.

(ईश चप्पलवार)
तहसीलदार बोरीवली



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

महाराष्ट्र शासन
वनविभाग
वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक,
पश्चिम मुंबई यांचे कार्यालय
Email Id:
rfomangrovewm@gmail.com
स. न, १४७ पंचम सोसायटीजवळ, गोखले महाविद्यालय मार्ग,गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१

जा.क्र. अ.पश्चिम मुंबई/स्टॅलीन.डी/465/2023-24 बोरीवली दि : 04/07/2023

प्रति,
मा. अध्यक्ष
तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी प. उपनगरे

विषय : Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of wetland.

संदर्भ : 1) मा. अध्यक्ष, तालूकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती, तथा उपविभागीय अधिकारी प. उपनगरे यांचे कडील जा.क्र/अविअ/मुंपउ/कार्या-5-कांदळवन/कावि-427/2023 दि. 22/05/2023
2) मा. विभागीय वनअधिकारी कुर्ला यांचेकडील जा.क्र.कक्ष-9/जमीन/655/सन 2023-24 दि. 13/06/2023
3) या कार्यालयाकडील जा.क्र.अ.प.मुंबई/स्थळपाहणी/359/2023 दि. 30/05/2023
4) वनपाल गोराई यांचेकडील पत्र जा.क्र.तक्रार/17/2023 दि. 27/06/2023

मुळ तक्रारदार : श्री. स्टॅलीन डी.

W-S 1133
तहसिलदार बोरीवली
यांचे कार्यालय
6704
28 JUL 2023
आवक क्र.
लिपीक अ.का.
नि.ना.त. ना.त.(मह) तहसिलदार

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकित प्रकरणी श्री. स्टॅलीन डी. यांचा मौजे गोराई स.क्र---- न.भु.क्र.185 मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अहवाल सादर करीत आहे तो खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| 1) स्थळाचे वर्णन : | मौजे गोराई, कुलवेम लेक, न.भु.क्र. 185 |
| 2) तक्रारीचा तपशील : | वरील विषयाप्रमाणे |
| 3) चौकशी करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम : | श्री. अजित परब वनरक्षक मालवणी<br>श्री. विकास पांडुळे वनरक्षक मनोरी |
| 4) स्थळाचे जी.पी.एस.रिडिंग - | 1) N 19 13 53.9 E 72 46 54.1<br>2) N 19 13 50.9 E 72 46 58.9<br>3) N 19 13 50.4 E 72 46 54.5 |
| 5) Geo Tag Photo - | सोबत जोडले आहेत. |
| 6) स्थळपंचनामा - | सोबत जोडला आहे. |



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE

| | |
|---|---|
| 7) तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा- | |
| अ) तक्रारीत नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र. | नाही |
| ब) सदरचे क्षेत्र वनविभागाच्या ताब्यात आहे किंवा नाही? | नाही |
| क) सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का? असल्यास अंतर (मी.) | नाही |
| ड) सदरचे क्षेत्र खासगी कांदळवन क्षेत्र आहे का ? | नाही |
| ई) सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? | सांगता येत नाही |
| 8) सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC Map नुसार नमुद जागेवर कांदळवन होते का ? | नाही |
| 9) सदरचा अतिक्रमण/भरणी सन 2005 च्या आधी किंवा नंतर करण्यात आले आहे किंवा कसे ? | — |
| 10) कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे का ? | नाही |
| 11) सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय: | नाही |
| 12) अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का? | नाही |
| 13) अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्र असल्यास संबंधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का? | या पत्राद्वारे कळविण्यात येत आहे. - |
| 14) कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे? | पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अन्वये प्राधिकृत अधिकारी |
| 15) वनक्षेत्रपाल यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय - | सदरचे क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच कांदळवनापासुन सदरचे क्षेत्र 50 मीटरच्या बाहेर येत आहे. MRSAC नकाशानुसार सन 2005 साली, सदर ठिकाणी कांदळवन नाही. तसेच सद्यस्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही.<br>सदर तलावामध्ये खोदकाम करुन चर पाडले आहेत, व खोदकाम करुन निघालेली माती तालावाच्या आतमध्येच ढीग मारुन ठेवली आहे. तसेच तलावाच्या मधील भागात मोठा खड्डा करुन |



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFI

| | |
|---|---|
| | त्यामधील माती काढुन तलावाच्या दक्षिणेकडील बाजुस ढीग मारुन ठेवली आहे.<br>तलावाच्या पुर्वेकडील बाजुस नविन खोदकाम करुन अंदाजे 25 मी. x 20 मी. व खोली 5 मी. असा खड्डा केलेला असुन त्यातुन निघालेली माती खड्डयाच्या सभोवार टाकली आहे. तसेच सदरचा तलाव ओव्हरफ्लो होण्याचा मार्ग बंद केलेला आहे. तलावाच्या क्षेत्रामध्ये कोणतेही कांदळवन प्रजातीचे वृक्ष दिसुन आले नाहीत, तसेच कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झालेला दिसुन आला नाही. |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. 3 अन्वये दि. 23/06/2023 रोजी संयुक्त स्थळपाहणी आयोजीत करण्यात आली होती, परंतु सदर दिवशी कोणत्याही विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहिले नाहीत.

सदरचा अहवाल माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत : पंचनामा, नकाशा, जिओ टॅग फोटो

(एस.के.खुणे)
सदस्य सचिव
तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन
सनियंत्रण समिती तथा वनपरीक्षेत्र अधिकारी,
मुं.कां.सं.घ. पश्चिम मुंबई.

प्रतिलीपी : 1) मा. सहा. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका आर/मध्य यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

2) मा. विभागीय वनअधिकारी मुं.कां.सं.घ कुर्ला यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर

3) मा. सदस्य सचिव जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन संरक्षण मुंबई यांना माहिती पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

4) मा. तहसीलदार बोरीवली यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत : श्री. स्टॅलीन डी. यांना माहितीसाठी सादर.

# पंचनामा

1) श्रीमती [illegible] हेंडरिक्स वय ५६ वर्षे धंदा-गृहिणी
उद्दारपाडा, गोराई पोलिसचौकीजवळ
बोरीवली (प) मुंबई -९१
मो.नं ९८३३५०५०५९

2) श्री. ओलन कोळी वय ५२ वर्षे धंदा-नोकरी
उद्दारपाडा, गोराई पोलिसस्टेशनजवळ
बोरिवली (पश्चिम) मुंबई-९१
मो.नं. ९६६४२५९६०४

आम्ही पंचास कांदळवन विभागाचे अधिकारी वनरक्षक गोराई, वनरक्षक मालवणी यांनी मौजे गोराई येथील कुल्वेम तलावाजवळ बोलावून घेऊन आम्ही पंचलोक एकत्र जमून आलो. तेथे जमून आल्यानंतर वनअधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र. ३५९/२०२३-२४ दि. ३०.०५.२०२३ रोजीचे पत्र वाचून दाखविले. सदर पत्रात श्री स्टॅलिन डी यांनी कुल्वेम तलावामध्ये उत्खनन करून तलावाचे बाजूस भरणी केल्याचे व सी.आर.झेड मधील अधिसूचनेचे उल्लंघन केल्याची तक्रार केली असल्याचे सांगितले व त्या अनुषंगाने समक्ष जागेवर सत्यपरिस्थिती पाहून पंचनामा लिहून देण्याकामी विनंती केलेवरून पंचनामा लिहून देत आहोत तो खालीलप्रमाणे.

आज दि. २३.०६.२०२३ रोजी आम्ही पंच, कांदळवन विभागाचे अधिकारी मौजे गोराई येथील कुल्वेम तलावाजवळ जमून आलो. तक्रारदार श्री स्टॅलिन डी हे समक्ष जागेवर उपस्थित होते. तक्रारदार श्री स्टॅलिन डी यांनी समक्ष दाखविल्याप्रमाणे तलावाची फिरून पाहणी केली असता तलावाच्या बाहेरील बाजूस उत्तर-पूर्व बाजूला सिमेंट कॉंक्रीट रस्ता असल्याचे दिसून येत आहे तसेच तलावालगत ताड, करंज, नारळ इत्यादींची झाडे दिसून येत आहे. तलावाचे आतील भागात पाहणी केली असता एक जुनी पक्की बांधकाम केलेली विहीर दिसून येत आहे त्यावर 'सर्व जातीच्या उपयोगाकरिता' असे तसेच सन १९४९-५० असे लिहिलेले दिसून येत आहे (कोरलेले) तलावामध्ये बेशरम, ताड, करंज ही झाडे असल्याचे दिसून येत आहे. तलावामध्ये खोदकाम करून चर मारले असल्याचे दिसून येत आहे व खोदकाम करून निघालेली माती तलावाचे आतमध्ये ढीग मारून ठेवला असल्याचे दिसून येत आहे. तलावाच्या मधील भागात मोठा खड्डा मारून त्यामधील माती काढून तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस ढीग लावून ठेवल्याचे दिसून येत आहे. तसेच तलावात थोड्या प्रमाणात पाणी असल्याचे दिसून येत आहे. तसेच तक्रारदार यांनी स्थळपाहणीवेळी

तलावाचे क्षेत्रामध्ये एक अतिक्रमण झाले असून त्यामध्ये कुंपण घातलेले असून त्यावर मोट बनविली असल्याचे दिसून येत आहे. सदरचे क्षेत्र तलावालगत असल्याचे तक्रारदार यांनी पाहणीवेळी सांगितले.

तसेच तलावाचे पूर्वेकडील बाजूस नविन खोदकाम करुन अंदाजे 25 मी x 20 मी असा खोदकाम केलेला खड्डा दिसून येत असून त्याची खोली अंदाजे 5 मी असल्याचे दिसून येत आहे. खड्डा खोदून निघालेली माती खड्ड्याच्या सभोवताल टाकलेली दिसून येत आहे. तसेच सदरचा तलाव ओव्हरफ्लो होऊन तलावाचे पाणी बाहेर जाण्याचा मार्ग बंद झाल्याचे दिसून येत आहे. कांदळवनक्षेत्र अंदाजे 200 मी लांब दिसून खाडी क्षेत्र दिसून येत आहे. तलावाचे क्षेत्रामध्ये पाहणीवेळी कोणतेही कांदळवन प्रजातीचे वृक्ष दिसून आले नाहीत अथवा कांदळवनाची तोड झालेली दिसून आली नाही. पाहणीवेळी तलावात बदके, बगळे बसलेले दिसून आले. तसेच तलाव क्षेत्रात खोदकाम यंत्राने करुन मातीचे ढिगारे लावलेले असल्याने ते पावसाचे पाण्याने वाहून मानवी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तलावालगत मातीचे ढिगारे लावल्याने पावसाच्या पाण्याने सदर माती लगत शेतीच्या क्षेत्रात जाऊन शेतीचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर क्षेत्राचे तक्रारदार यांचे समवेत फिरून पाहून जी.पी.एस. नोंदी घेतल्या. त्या खालीलप्रमाणे

1) 19 13 53.9 , 72 46 54.1
2) 19 13 50.9 , 72 46 58.9
3) 19 13 50.4 72 46 54.5

सदर तलाव क्षेत्राच्या चतुःसिमा घेतल्या त्या खालीलप्रमाणे.
पूर्वेस - मावळी गांगा. आदिवासी घर.
पश्चिमेस - रस्ता, गोराई मनोरीगाव जमस्ता
उत्तर - खाजगी मिळकत
दक्षिण - खाजगी मिळकत

तसेच सदर स्थळपाहणीस महसूल विभागाकडील, बी.एम.सी., नगरभूमापन, पोलिस विभागाकडील अधिकारी त्यांना कळवूनसुद्धा स्थळपाहणीस हजर राहिले नाहीत.

वर नमूद केलेल्या परिस्थितीचा पंचनामा आम्ही पंच, कांदळवन विभागाचे अधिकारी, तक्रारदार यांनी सर्वांनी मिळून पाहून, पाहिल्याप्रमाणे लिहिण्यात आला. पंचनाम्यात नमूद केलेली परिस्थिती सत्य असल्याची खात्री झाल्याने वनअधिकाऱ्यासमक्ष पंचनाम्यावर आम्ही समजपणाने पंचनाम्यावर सह्या केल्या आहेत.

दि. पंचनामा लिहून दिला असे

समक्ष

1) [signature]

2) [signature]

[signatures]



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE, COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE

महाराष्ट्र शासन
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय**
डॉ. न. रा. करोळे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दूरध्वनी क्र. २८०७५०३४ ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन

क्रमांक :-तह/बोरी/टे-२/कांदळवन/कावि-११३३/२०२३
दिनांक :-२८/०८/२०२३

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

विषय:-**Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of wetland**
श्री. स्टॅलीन डी.

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५-कांदळवन/कावि-४२७/२०२३ दि. २२/०५/२०२३
२) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. अ. पश्चिम मुंबई/स्टॅलीन डी./४६५/२०२३-२४ दि. ०४/०७/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपलेकडील संदर्भिय क्र. १ चे अनुषंगाने सादर करणेत येते की, प्रकरणी तक्रारदार, श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे-गोराई, ता. बोरीवली येथील (Culvem Lake) केल्वेम तलावामध्ये उत्खनन करून, तसेच सदर तलावाच्या बाजूस भरणी करून सदर तलावाचा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी वनरक्षक मालवणी व वनरक्षक मनोरी यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी करून संदर्भिय क्र. २ चे पत्रान्वये या कार्यालयात सादर केलेल्या अहवालानुसार खालीलप्रमाणे मुद्देनिहाय अहवाल सादर करणेत येते आहे.

प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांचे अहवालात रकाना क्र. १५ मध्ये तक्रारीत नमूद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. तसेच कांदळवनापासून सदरचे क्षेत्र ५० मी.च्या बाहेर येत आहे. तसेच MRSAC नकाशानुसार सन २००५ साली सदर ठिकाणी कंदळवन नाही. तसेच सद्य:स्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन नाही असे नमूद केले आहे.

तसेच तक्रारीत नमूद तलावामध्ये खोदकाम करून चर पाडले आहेत व खोदकाम करून निघालेली माती तलावाच्या आतमध्येच ढीग मारून ठेवली आहे. तसेच तलावाच्या मधील भागात मोठा खड्डा करून त्यामधील माती काढून तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस ढीग मारून ठेवली आहे.

सदर तलावाच्या पूर्वेकडील बाजूस नविन खोदकाम करून अंदाजे २५ मी. x २० मी. व खोली ५ मी. असा खड्डा केलेला असून, त्यातून निघालेली माती खड्ड्याच्या सभोवार टाकली आहे. तसेच सदरचा तलाव ओव्हरफ्लो होण्याचा मार्ग बंद केलेला आहे. तलावाच्या क्षेत्रामध्ये कोणतेही कांदळवन प्रजातीचे वृक्ष दिसून आले नाहीत. तसेच कांदळवनाची तोड अथवा -हास झालेला दिसून आलेला नाही, असे वनपरिक्षेत्र अधिकारी, मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी संदर्भिय अहवालात नमूद केले आहे. कांदळवन कक्षाने खालीलप्रमाणे जी.पी.एस. रिडींग घेतलेले आहे.

१) 19 13 53.9, 72 46 54.1

२) 19 13 50.9 72 46 58.9

३) 19 13 50.4 72 46 54.5

सदर तलाव क्षेत्राच्या चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस - मोकळी जागा, आदिवासी घरे.

पश्चिमेस - रस्ता, गोराई मनोरी गांव जोड रस्ता.

उत्तर - खाजगी मिळकत.

दक्षिण - खाजगी मिळकत.

सदरचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर. सोबत वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचा अहवाल सादर करणेत येत आहे.

(ईरेश चप्पलवार)
तहसीलदार बोरीवली



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१
ईमेल- sdomsdest@gmail.com
दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६

क्र. कार्या-५/कावि- ४२७/२०२२
दि. ०५/०९/२०२२

प्रति,
१)सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी
मुंबई
२) तहसीलदार बोरीवली
३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुं.कां.सं.घ.पश्चिम मुंबई
४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली

विषय :- संयुक्त स्थळपहाणी बाबत...

(Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of Wetland बाबत श्री.स्टॅलीन डी. यांची तक्रार)

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-२ आय/कावि-२८७/२०२३, दि. १७/०५/२०२३

विषयांकित प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.१०/०८/२०२३ व दि. ०१/०९/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विषयांकित तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तरी विषयांकित तक्रारीत नमूद जमिनीची दि.११/०९/२०२३ रोजी सकाळी ११,०० वा. आयोजीत केली आहे. तरी सदर दिवशी व वेळी स्थळपाहणीसाठी उपस्थित रहावे.

(डॉ.भागवत गावंडे)
उपविभागीय अधिकारी
मुंबई पश्चिम उपनगर

प्रत:- श्री. स्टॅलिन डी. संचालक वनशक्ती

२/- आपण वर नमूद रोजी व वेळी संयुक्त स्थळपाहणीचे वेळी उपस्थित रहावे, ही विनंती.



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-1

# मंडळ अधिकारी कुरार यांचे कार्यालय

सी.के.पी. कॉलनी, गणपती मंदीर समोर, बोरीवली (प), मुंबई-४०० ०९१

मं.अ.कु./मनोरी/बा.क्र. ३४/२०२३
दिनांक - १२/०९/२०२३

प्रति,
मा. तहसीलदार बोरीवली

विषय:-Request for Restoration of Culvem Lake Gorai and also action against Destroyers of wetland
श्री. स्टॅलीन डी.

संदर्भ :-मा. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४२७/२०२३ दि. ०५/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने तक्रारदार, श्री. स्टॅलिन डी, यानी कुलवेम तलावाबाबत केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने विषयांकीत मिळकतीची दि. ११/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता १) सहाय्यक कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, २) तहसीलदार बोरीवली, ३) वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई, ४) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती.

सदर स्थळपाहणीस मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, २) मा. उपविभागीय अधिकारी, मुं.प.उ., ३) वनपरिमंडळ अधिकारी, गोराई, ४) परिरक्षण भूमापक क्र. ३, ५) मंडळ अधिकारी, कुरार, ६) तलाठी साझा गोराई व तक्रारदार, श्री. स्टॅलिन डी चे प्रतिनिधी, श्री. नंदकुमार पवार हे उपस्थित होते. सदरहू स्थळपाहणीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

स्थळपाहणी दरम्यान मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ येथील तलावाची पाहणी केली असता, त्यावेळेस सदर तलाव हा पूर्णत: पावसाच्या पाण्याने भरलेला दिसून आला. तसेच तलावाच्या उत्तर व पूर्व दिशेस सिमेंट क्राँक्रीटचा रस्ता असून, तलावाच्या बाजूने सिमेंटचा पक्का कट्टा असल्याचेही दिसून आले. व तलवामध्येच उत्तरेकडील बाजूस जुने पक्के बांधकाम केल्याची विहीर आहे. व तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस गोराई व मनोरी गावाला जोडणारा पक्का रस्ता आहे. व तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस एक अतिक्रमण व दुसरी विहीर आहे. त्यावर मोट बांधलेली आहे. तसेच तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस मोठा मातीचा ढीग लागलेला दिसून आला. व तलावाच्या पूर्वेकडील नविन खोदकाम करून अंदाजे २५ x २० मीटर असा खड्डा केलेला असून, त्यामध्ये पाणी साचल्याचेही दिसून आले. व त्याची खोली अंदाजे ५ मीटर इतकी आहे.

पाहणीचे वेळी तलावाचा वापर गावकरी कपडे धुण्याकरीता, जनावरांना पाणी पिणेकरीता तसेच आंघोळीकरीता वापर होत असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले. तलावाची चुर्तसिमा पुढीलप्रमाणे आहे. पूर्वेस मोकळी जागा, आदिवासी घरे, पश्चिमेस डांबरी पक्का रस्ता, उत्तरेस खाजगी मिळकत, दक्षिणेस खाजगी मिळकत आहे. तसा मूळ पंचनामा सोबत सादर केलेला आहे.

मौजे-मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ ही मिळकत मिळकतपत्रिकेनुसार सरकारी असून जागेवर नैसर्गिक तलाव आहे. **गोराई तसेच मनोरी या गांवामध्ये पाणथळ जमिनी नाहीत.** सदरचा तलाव सुशोभीकरणाकरीता मा. आमदार श्री. सुनिल राणे, बोरीवली विधानसभा यांना मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-७क/कावि-४१/२०२३ दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. सोबत परवानगीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे.

उपरोक्त नमूद तलावाचे सुशोभीकरण करतांना माती काढण्यात आली असून, सदरची माती तलावाच्या क्षेत्रामध्ये ठेवण्यात आलेली आहे. " **महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ चे मुख्य नियमांचे नियम ४६ मध्ये सुधारणा करून दि. ११/५/२०१५ रोजीच्या सुधारीत अधिसुचनेनुसार, उपरोक्त गौणखनिज उत्खनन नियमात बदल करून इमारतीच्या गौणखनिज उत्खननाबाबत ज्यावेळी एखादया जिमिनीचा, एखादया भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामीत्वधन आकारले जाणार नाही** असे नमूद आहे."

मौजे- मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या सरकारी तलावाची मोजणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून सदरच्या तलावाची मोजणी केल्यानंतर आजुबाजुच्या स्थानिक लोकांची अतिक्रमणे सरकारी तलावामध्ये येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. **सर्व अतिक्रमणधारकांना मा. उप जिल्हाधिकारी (अति./निष्का), मालाड यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० अंतर्गत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रकरणी पुढील कार्यवाही मा. उप जिल्हाधिकारी (अति./निष्का) मालाड यांचे कार्यालयामार्फत सुरू आहे. तसेच मौजे- मनोरी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८५ या जागेमध्ये तलाव असून, (७/१२ कांदळवन नाही) सदर जागा पाणथळ मध्ये मोडत नाही.**

माहितीस्तव सविनय सादर.

२०/०१/२०२

मंडळ अधिकारी, कुरार



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-

मौजे : मनोरी
दिनांक : ११.०९.२०२३

# पंचनामा

आम्ही खाली सह्या करणारे उपस्थित स्थानिक पंचलोक सदर जागेची परिस्थिती व वस्तुस्थिती पाहून पंचनामा लिहून देतो की, मा. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.कार्या-५/कावि-७८५/२०२३ दिनांक :-५.०९.२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने पंचनामा करणेबाबत मा. अवर सचिव पर्यावरण विभाग श्री विशाल मधाळे, मा. उपविभागीय अधिकारी पश्चिम उपनगरे श्री भागवत गावंडे, वनपरिमंडळ अधिकारी गोराई श्री सतीश जाधव, परिरक्षण भूमापक क्र. २, श्रीमती दिपा राणे मंडळ अधिकारी कुरार श्री सतीश भागवत, तलाठी गोराई सचिन कोचळे तक्रारदार श्री स्टॅलिन डी चे प्रतिनिधी श्री नंदकुमार पवार. इत्यादी अधिकारी व कर्मचारी सह आम्ही पंच उपस्थित होतो.

त्यानुसार आज दिनांक ११.०९.२०२३ मौजे-मनोरी तालुका बोरीवली येथील कुलवेम तलाव, गोराई-मनोरी रोड, येथील जागेची प्रथम सदर अधिकारी व कर्मचारी तसेच तक्रारदार यांच्या प्रतिनिधी समवेत पहाणी केली. असता सदर जागेच्या न.भू.क्र. ७५ असल्याचे परिरक्षण भूमापक यांनी सांगितले. त्यानंतर येथील तलावाची पहाणी करण्यात आली त्यावेळेस तलाव हे पूर्णतः पावसाच्या पाण्याने भरल्याचे दिसून आले. तसेच तलावाच्या उत्तर व पूर्व दिशेस सिमेंट काँक्रिटचा रस्ता आहे. तसेच तलावाच्या बाजूने सिमेंटचा पक्का कट्टा आहे. व तलावा मध्येच उत्तरेकडील बाजूस जुने पक्के बांधकाम केल्याची विहिर आहे. तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस गोराई व मनोरी गावाला जोडणारा पक्का रस्ता आहे. व तलावाच्या दक्षिणेकडील बाजूस तलावालगत एक अतिक्रमित अतिक्रमण असून दुसरी विहिर आहे. व त्यावर मोटर असल्याचे दिसून आले. तसेच तलावाच्या चतुःसीमे-

(क्रमशः पान २)

काठील बाजूस मातीचा मोठा ढिग लागलेला दिसून आला. व तलावाच्या पूर्वकडील बाजूस नवीन खोदकाम करून अंदाजे २५×२० मीटर असा खड्डा केलेला दिसून येत आहे. त्यामध्ये पहाणीवेळी पाणी साचल्याचे दिसून येत आहे. व खड्ड्याची खोली अंदाजे ५ मीटर इतकी असल्याचे दिसून आले.

सदर तलावाचा वापर पहाणीवेळी मात्र कशी कपडा धुण्याकरीता, आणी व जनावरे धुण्याकरीता व पाणी पिण्याकरीता वापर असल्याचे दिसून येते. सदर तलावाच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे

पूर्वेस - मोकळी जागा आदिवासी घरे
पश्चिमेस - डोंगरी पक्का रस्ता.
उत्तरेस - खाजगी मिळकत
दक्षिणेस - खाजगी मिळकत

असे असून सदर पंचनामा दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी चालू करून ३ वाजून ३० मिनिटांनी संपविण्यात आला करिता खाली सही करीत आहे

तयार तारीख ११/०९/२०२३

(१) [signature] 11/9/23
श्री विशाल भदले
मा. झवर सचिव
पर्यावरण विभाग

(४) [signature] ११-०९-२०२३
(श्री सतिश भागवत)
मंडळ अधिकारी कुरार

(२) [signature] 11-9-2023
श्री भागवत गावडे
मा. उपविभागीय अधिकारी
पश्चिम उपनगर

(५) [signature]
श्री सतिश जाधव
वन परिमंडळ अधिकारी

(३) [signature] 11/09/2023
श्री नंदकुमार पवार
स्वीलीग संचे प्रतिनिधी
वनशक्ती संस्था

(६) D.D. Rane
श्रीमती दिपा राणे
परिरक्षण भूमापक क्र. ३

(७) [signature]
श्री सचिन काळे
तलाठी सजा गोरेगाई

[signature]
श्री पवन पाटील
वनशक्ती संस्था
7387103203

Generated from eOffice by SHARAD MADHUKAR ..., REV ASST (SMB), ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT COLLECTOR OFFICE

महाराष्ट्र शासन

# मालमत्ता पत्रक

ULPIN: 74843965472

[महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर व शहर भूमापन) नियम,१९६९ यातील नियम ७ नमुना "ड"]

74843965472

| गाव/पेठ : मनोरी | तालुका/न.भू.का. : नगर भूमापन अधिकारी,बोरीवली | जिल्हा : मुंबई उपनगर |
|---|---|---|

| नगर भूमापन क्रमांक | शिट नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | धारणाधिकार | शासनाला दिलेल्या आकारणीचा किंवा भाड्याचा तपशील आणि त्याच्या फेरतपासणीची नियत वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १८५ | | | २०५०७.४० | जी | - |

| | |
|---|---|
| सुविधाधिकार : | |
| हक्काचा मूळ धारक : वर्ष : १९६८ | H महाराष्ट्र सरकार |
| पट्टेदार : | |
| इतर भार : | - |
| इतर शेरे : | - |

| दिनांक | व्यवहार | खंड क्रमांक | नविन धारक(धा), पट्टेदार(प) किंवा भार (इ) | साक्षांकन |
|---|---|---|---|---|
| 10/03/1997 | मा.अधि.भूमि अभिलेख मुं.उ.जि.यांचेकडील क्र.न.भू./शा.मि./स./९७/३५३/५/बांद्रा दि.२०/१/९७ अन्वये.सदरची मिळकत ही विकास आराखडयानुसार "ना विकास क्षेत्र" कडे आरक्षीत असलेची नोंद घेतली. | | | सही- 10/03/1997 न. भू. अ. क्र.६ मुंबई |
| 24/08/2015 | मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परीपत्रक क्र.ना.भू.१/सि.प./अक्षरी नोंद /२०१५ , पुणे दिनांक १६/०२/२०१५ व इकडील आदेश क्र. न. भू मनोरी / फे क्र १९१ दिनांक २४/०८/२०१५ अन्वये केवळ चौकशी नोंदवहीवरील क्षेत्र व मिळकत पत्रिकेवरील क्षेत्र मेळात असलेने मिळकत पत्रिकेवर नमूद अंकी क्षेत्र अक्षरी वीस हजार पाचशे सात पूर्णांक चार दशांश मात्र चौ .मी दाखल केले. | | | फेरफार क्रं. १९१ प्रमाणे सही 24/08/2015 न.भू.अ.बोरीवली |

हे मालमत्ता पत्रक डिजिटली स्वाक्षरित केलेले आहे.

हि मिळकत पत्रिका (दिनांक 03/08/2018 12:08:00 AM रोजी) डिजिटल स्वाक्षरी केली आहे



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : ०२२-२६५५६७११, फॅक्स : २६५५६८०५, ई-मेल : collectormsd@gmail.com

क्र. सी/कार्या-७ क/काचि-४१/२०२३
दि.०७/०२/२०२३

प्रति,
उप अभियंता-५, (प),
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा, मुंबई

**विषय :** मौजे-मनोरी येथील न.भू.क्र.१८५ वरील संजाव(लोटस) तलावाच्या सुशोभिकरणास नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत..

**संदर्भ :** १) शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील निर्णय दिनांक २२/२/२००८
२) शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील निर्णय दि.३/६/२०१०
३) आपलेकडील पत्र जा.क्र.का.अ./प./मुंझोसुमं/१५२/४५११/२२, दिनांक ०६/०४/२०२२
४) नगर भूमापन अधिकारी, मालाड यांचेकडील अहवाल दि.०१/०८/२०२२
५) मा.आ.श्री.सुनील राणे यांचेकडील पत्र दिनांक ०३/०१/२०२३
६) तहसिलदार, बोरीवली यांचेकडील अहवाल दि.१०/०१/२०२३
७) या कार्यालयाचे पत्र क्र.सी/कार्या-७क/काचि-११/२०२३, दि.१८/०१/२०२३

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये सार्वजनिक प्रयोजनाबरोबरच सार्वजनिक विकास कार्यक्रमांतर्गत खासदार/आमदार/नगरसेवक यांच्या निधीअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील शासकीय जमिनीवर व्यायामशाळा बांधणे, समाजमंदीर बांधणे, तलावाचे सौंदर्यीकरण करणे, तलाव स्वच्छ करुन त्या तलावामध्ये प्रकाश योजना करणे, झाडांची लागवड करणे, स्मशानभूमीचा विकास, मोकळ्या मैदानाचे सुशोभीकरण करणे इ. कामे करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करणेत आलेले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.१८५ वरील संजाव(लोटस) तलाव अत्यंत गलिच्छ व वापरण्याजोगे नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे मा.आ.श्री.सुनील राणे, बोरीवली विधानसभा यांचे स्थानिक विकास निधीतून सदर तलाव आधुनिक पध्दतीची यंत्र सामुग्री वापरुन संरक्षण भिंत, जॉगिंग ट्रॅक, इलेक्ट्रीक लाईट, सोलार दिवे, रेलिंग, कुंपण भिंत, फुलझाडे लावणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय, फवारे, ओपन जिम इत्यादीव्दारे पुनर्जिवित व सुशोभित करणेकरिता मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडा घटक) यांचेमार्फत नाहरकत प्रमाणपत्र देणेची विनंती केली आहे.

त्या अनुषंगाने उपरोक्त क्रमांक ४ अन्वये नगर भूमापन अधिकारी बोरीवली यांनी अहवाल सादर केला असून मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.१८५ वरील मिळकतीचे क्षेत्र २०५०४.४० चौ.मी. आहे. मिळकत पत्रिकेनुसार मालकी "महाराष्ट्र सरकार" दाखल आहे. धारणाधिकार "ग" नमुद आहे. जागेवरील परिस्थिती पाहता सदर तलावाच्या भोवती मोकळी जागा व झाडे-झुडपे आहेत. सदर तलावास लागू रस्ता आहे. तलावा पाणी असून त्याचा वापर शेतीसाठी करणेत येत आहे.



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (SMB)-ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE-M

संदर्भीय पत्र क्रमांक ६ अन्वये तहसिलदार बोरीवली यांचेमार्फत अहवाल सादर करणेत आला असून सदर अहवालानुसार मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.१८५ वरील मिळकतीचे क्षेत्र २०५०४.२० चौ.मी. असून जागेची निश्चित मालकी महाराष्ट्र सरकार यांची आहे. सदर जागा तलावाखालील असल्यामुळे जागेला [illegible] नंबर नाही. सदर तलावाचा वापर गावकरी शेती व इतर दैनंदिन कामाकरिता करतात. जागेच्या पूर्वेस रस्ता, पश्चिमेस गोराईकडे जाण्याचा मार्ग, दक्षिणेस खाजगी रस्ता व उत्तरेस रस्ता आहे. सभोवताली झाडे-झुडपे आहेत. सदर जागेवर तलाव असून तेथे कांदळवन अथवा खाजण जमीन नाही. सदर जागेची हद्द निश्चिती झाल्यानंतरच अतिक्रमण आहे किंवा कसे ते निश्चित होईल. सदर मिळकती बाबत गाव अभिलेखात मा. न्यायालय व इतर ठिकाणी दावा प्रलंबित असल्याबाबत नमूद नसून सदर मिळकतीबाबत तहसिलदार यांचे कार्यालयात इतर प्रतिनिधींमार्फत अर्ज प्राप्त झालेला नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील विकास नियोजन आराखड्यानुसार विषयांकीत मिळकत ही हरीत क्षेत्रात (Green Zone) समाविष्ट होत असल्याचे दिसून येते. सौंदर्यीकरणाचे कामाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.५ अन्वये मा.आमदार महोदयांनी कामाची सुरुवात करणेपूर्वी सदर तलावाची विनामुल्य मोजणी करुन देणेची विनंती केली होती. त्याकरिता संदर्भ क्र.७ अन्वये या कार्यालयाने नगर भूमापन अधिकारी बोरीवली यांना मोजणी करुन देणेबाबत कळविले आहे.

सदर सुशोभिकरणामुळे/सौंदर्यीकरणामुळे जनतेच्या सुख-सोयीमध्ये तसेच शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडून पर्यटनास चालना देण्याच्या उद्देशाने संदर्भीय शासन निर्णयानुसार व प्राप्त अधिकारानुसार व्यापक जनहिताच्या दृष्टीने खाली नमूद अटी/शर्तींच्या अधीन राहून मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.१८५ वरील सेजाव(लोटस) तलावास आधुनिक पध्दतीचे यंत्र सामुग्री वापरुन जॉगिंग ट्रॅक, इलेक्ट्रीक लाईट, सोलार दिवे, रेलिंग, फुलझाडे लावणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय, फवारे, ओपन जिम इत्यादीव्दारे पुनर्जिवित व सुशोभिकरण करणेकरिता मा.आ.श्री.सुनील राणे यांचे स्थानिक विकास निधीतून करणेस खाली नमूद अटी/शर्तींच्या अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.

अटी व शर्ती :

१) उक्त कामाकरिता वापरात येणाऱ्या जागेची मालकी शासनाचीच राहील.

२) सदर नाहरकत प्रमाणपत्र म्हणजे जागा प्रदान करणे नव्हे. अशा ना हरकत प्रमाणपत्रामुळे अशा जागेवर कोणत्याही खाजगी व्यक्तीचे/संस्थेचे कोणत्याही प्रकारचे हक्क आणि हितसंबंध निर्माण होणार नाहीत.

३) ज्या प्रयोजनार्थ ना-हरकत देण्यात येत आहे त्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ सदरील मिळकतींचा वापर करता येणार नाही.

४) सदरील कामाकरिता आवश्यकतेनुसार MCZMA, कांदळवन कक्ष, नियोजनाच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिका या विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

५) उक्त मिळकतींवर तलावाच्या सुशोभिकरणाकरीता येणाऱ्या कामाकरिताच परवानगी देणेत येत आहे.

([illegible])
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)
मुंबई उपनगर

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही आहे

प्रत :१) मा. आ.श्री.सुनील राणे, बोरीवली विधानसभा, १५२, [illegible], [illegible] नाट्यशाला लेन, तहसिलदार कार्यालयाजवळ, बोरीवली पश्चिम मुंबई-९२ यांना माहितीस्तव.
२) तहसिलदार बोरीवली.
३) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली
४) सहा.आयुक्त, आर/मध्य विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई



Generated from eOffice by SHARAD MADHUKAR BOTKE , COLMSD-REV-ASST (BMB) ADDL. TAHSILDAR REVENUE, REVENUE ASSISTANT, COLLECTOR OFFICE